


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७१३ . वा | सोमवार | दि. १८ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये




# जनसंपर्क व समाजसेवेत जिल्ह्यात

# भाईजी नंबर वन...

## लोकप्रतिनिधीही पडतात भाईजींच्या जनसंपर्कासमोर फिके

**भाग-8**

**जनसंचलन/बुलढाणा**

आशिया खंडातील सर्वांत मोठी पतसंस्था असा मान असलेल्या बुलढाणा अर्बनच्या माध्यमातून राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांनी गेल्या ३५ वर्षांत मोठा जनसंपर्क निर्माण केला. आज राज्यभरातच नव्हे तर देशभरात भाईजींच्या कार्याचे कौतुक सातत्याने होत असते. त्यांच्याशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आज हजारोच नव्हे तर लाखो लोक जोडल्या गेलेले आहेत. आज जिल्ह्यात एक अजातशत्रू व्यक्तिमत्व शोधण्याचा प्रयत्न केला तर भाईजींचे नाव समोर आल्याशिवाय राहत नाही. दांडगा जनसंपर्क, विकासाची आगळीवेगळी दृष्टि, कार्याचा विस्तारित आवाका या सर्वच बाबी भाईजींच्या कार्यकर्तृत्वाचे गुणगान करण्यास पूर्ण आहेत. बुलढाणा अर्बनच्या माध्यमातून भाईजींनी जिल्ह्यात व राज्यात जो रोजगार उत्पन्न केला, त्याला खरेच तोड नाही. आज या पतसंस्थेत कार्यरत तब्बल ७ ते ८ हजारांच्या आसपास कर्मचारी आपला चरितार्थ चालवण्यास सक्षम झालेले आहे. प्रत्येक कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत भाईजींचा प्रत्यक्ष संपर्क सातत्याने असतो. याशिवाय बुलढाणा अर्बनच्या माध्यमातून आजवर भाईजींनी जिल्ह्यात व जिल्हाबाहेर मोठ्या प्रमाणात व्यावसायिकांना कर्जाचे वितरण केले. या कर्जाच्या माध्यमातून त्यांचा व्यवसाय भरभराटीला आला. ते सर्व व्यावसायिक त्यांच्या कुटुंबातील सदस्य हे भाईजींच्या सोबत आहेतच, यात काही शंका नाही. शिवाय सहकार विद्या मंदिराच्या माध्यमातून भाईजींनी जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्राचेही आकाश व्यापून टाकले आहे. आज सहकार विद्या मंदिराच्या माध्यमातून बुलडाणा जिल्ह्यात २० शाळांमधून जवळपास २६ हजार विद्यार्थी दर्जेदार उच्च प्रतीचे शिक्षण अर्जित करीत आहेत. त्या सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांशीही भाईजींचा थेट संपर्क असतो. त्यामुळे जनसंपर्काच्या बाबतीत भाईजींच्या व्यक्तिमत्वाला कुठेही तोड नाही.

✻भाईजी यांचे सर्वच धर्माली व सर्वच जातीतील नागरिकांशी अत्यंत सौहार्दाचे संबंध आहेत. त्यांच्याकडे आलेला व्यक्ती कोणत्याही जाती-धर्माचा असो, त्याला मदत ते सातत्याने करीत असतात. त्यामुळेच आज जिल्ह्यातील सुज्ञ लाखो लोकांचा विश्वास असून त्यात भाजपा सारख्या राजकीय पक्षाचा भर असल्यास बुलडाणा जिल्हयात विकासाची गंगा वाहील जिल्ह्यातील तमाम नागरिक भाईजींकडे आशेने पाहत असतो. जिल्ह्यातील व्यापारी वर्गात मोठ्या प्रमाणात भाईजींच्या कार्याची क्रेझ आहे. व्यापाऱ्यांना आर्थिक उलाढाल करताना सोयीस्कर व्हावे, यासाठी ते बुलढाणा अर्बनच्या माध्यमातून वर्षातील ३६५ दिवस सकाळी ८ ते रात्री ८ अशी अविरत बँकिंग सेवा देत असतात. त्यामुळेच जिल्ह्यातील व्यापाऱ्यांशी भाईजींचे अत्यंत घनिष्ठ संबंध आहेत. एकीकडे दांडगा जनसंपर्क आणि दुसरीकडे बुलढाणा अर्बनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमे विविध प्रकारची विकासकामे ही किमया भाईजींनी करून दाखवली आहे. आज बुलढाणा अर्बन ने तिरुपतीसह विविध देवस्थानांच्या ठिकाणी भक्तनिवास उभारले. ज्याचा लाभ जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील भाविकांना होतो. त्या ठिकाणी जिल्ह्यातील भाविक गेल्यास त्यांना माफक दरात राहण्याची जेवणाची सुविधा प्राप्त होते. तसेच उच्च शिक्षणासाठी पुणे येथे वसतिगृह ही बांधण्यात आले असून तिथे जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थी आहेत .कोणतेही राजकीय लोकप्रतिनिधींची मदत नसंताना एवढी कामे केली आहे.या लोकसभा निवडणूक २०२४ भाजपानीच ही जागा लढावी अशी भाजपाच्या सामान्य कार्यकर्त्यांपासून तर आणीबाणीतल्या सर्व एकनिष्ठ कार्यकर्त्यांची मागणी असून निवडणूक राधेश्याम चांडक यांना तिकीट देऊन लढवावी बहुमताने विजय आपलाच असल्याची घराघरात चर्चा असल्याचे दिसून येत आहे. जिल्हाभरात बुलढाणा शहराचा चेहरामोहरा बदलवून विकासाची एक चुणूक त्यांनी अनेकदा दाखवली आहे. आज बुलढाणा अर्बनचे जिल्ह्यात विविध ठिकाणी वेअर



भारत देशात विकासाची गंगा आणणारे नरेंद्रजी मोदी व अमितजी शहा यांच्याकडे बुलडाणा लोकसभा निवडणूक उमेदवार देण्याची जिल्हावासीयांची मागणी

हाऊसेस आहेत. त्या ठिकाणी शेतकऱ्यांना आपला माल साठवण्याची सुविधा झाली.एकेकाळी मलकापूर-चिखली महामार्गाचे रुंदीकरण व देखभाल बुलढाणा अर्बनकडेच होती. अशा स्थितीत तर आता भाईजींकडे बुलढाण्याची खासदारकी आली, तर त्याचा जिल्ह्याच्या विकासाला मोठा लाभ होऊ शकतो. जिल्ह्याचा संपूर्ण चेहरा-मोहरा बदलून जाऊ शकतो. गेल्या अनेक वर्षांमध्ये बुलढाणा शहर व जिल्हा विकासात मागे राहिलेला आहे. खासदार प्रतापराव जाधव यांच्या उदासीन धोरणामुळे जिल्हा विकासाच्या बाबतीत खूपच मागे राहिला. प्रतापराव जाधव यांच्या निष्क्रियपणाची जाणीव भाजपला देखील चांगलीच आहे. त्यामुळेच या वेळेस भाजप देखील हा मतदारसंघ शिवसेनेकडून खेचून घेऊ पाहत आहे. या स्थितीत जिल्ह्याच्या विकासाला गती देणारे व्यक्तिमत्व असलेल्या भाईजींना भाजपने तिकीट देणे गरजेचे आहे.भाईजींना तिकीट ही भाजपच्या विजयाची नांदीच ठरू शकते त्यामुळे खरे तर भाजप पक्षश्रेष्ठींनी यासंदर्भात लवकरात लवकर विचार करून भाईजींना उमेदवारी घोषित करावी, अशी मागणी जिल्हाभरातून ही होत आहे.

# दारूच्या नशेत बापाने केला मुलावर - कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला...

**जनसंचलन/मेहकर**

दारूच्या नशेत झालेल्या वादातून पोटच्या मुलावर बापाने कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला केल्याची घटना मेहकर तालुक्यातील भोसा येथे रविवारी दुपारी घडली. यामध्ये मुलगा गंभीर जखमी झाला असून, त्याची प्रकृती चिंताजनक आहे. कैलास विठ्ठल गाढवे (वय ३५) असे गंभीर जखमी झालेल्या मुलाचे नाव आहे तसेच आरोपी विठ्ठल पांडुरंग गाढवे हा पसार झाला आहे. भोसा गावातील विठ्ठल पांडुरंग गाढवे याने पोटचा मुलगा कैलास गाढवे याच्याशी दारूच्या व्यसनापायी वाद घातला. या वादातूनच विठ्ठल गाढवेने कैलास गाढवे याच्यावर कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला केला. कैलासच्या मानेवर, पाठीवर, गालावर, तोंडावर सपासप वार केले. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या कैलास गाढवे यांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत. वडील मुलावर कुऱ्हाडीने वार करीत असताना जमा झालेल्यांपैकी कुणीही मदतीसाठी धावले नाही. कैलास गाढवे हा आई- वडिलांपासून वेगळा राहत होता. त्याला एक साडेचार वर्षांचा मुलगा व दीड वर्षांची मुलगी व पत्नी आहे. हल्ला केल्यानंतर विठ्ठल गाढवे फरार झालेला असून, बातमी लिहीपर्यंत डोणगाव पोलिस स्टेशनला कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अवैध रेतीचे पाच टिप्पर दंडात्मक कारवाईसाठी पोलीस ठाण्यात लावले १३ लाखाचा होऊ शकतो दंड

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा उपविभागात देऊळगावराजा तालुक्यातील खडकपूर्णा धरण, नारायणखेड, डिग्रस व आसपासच्या रेतीघाटांवरुन अवैधरित्या रेतीची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते रेतीमाफियांचे नेटवर्क अद्यावत व स्ट्रॉग असल्यामुळे रेती माफिया महसूल अधिकाऱ्यांच्या जाळ्यात येत नाही मात्र हे नेटवर्क भेदून जीव धोक्यात घालून तहसीलदार वैशाली डोंगरजाळ महसूल ना तहसीलदार डॉ आस्मा मुजावर यांनी धाडसी कारवाई करत एकाच वेळेस पाच टिप्पर पकडून दंडात्मक कारवाईसाठी आंढेरा पोलिसात जमा केले आहे त्यामुळे शासनाला जवळपास १३ लाख रुपयाचा दंडाच्या रूपाने महसूल मिळणार आहे या कारवाईमुळे रेती माफीया मधे एकच खळबळ उडाली आहे अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धुळ फेकून या रेतीघाटातून मोठ्या प्रमाणात रेती चोरी होत आहे. मात्र अधिका-यांची जर मानसिकता असेल तर या रेतीचोरीला खरोखरच आळा बसू शकतो हे, नायब तहसीलदार डॉ आस्मा मुजावर आणि पथकाने दाखवून दिले आहे. या महसूल अधिकाऱ्यांनी तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली १५ मार्च रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार वॉच ठेवून रेतीची अवैधरित्या वाहतूक करणारे एम.एच.२१-बी.एच. ०९३२, एम.एच.२८-बी.बी. ३९३३, एम.एच.-२८-ए.बी.-२३३३, एम.एच.२७-एक्स-५०३८, एम.एच.१३-डी.क्यू. ५२७८ या क्रमांकाच्या टिप्पर अवैध रेती वाहतूक करताना रंगेहात पकडून अंढेरा पोलिसाना घटना स्थळी बोलावून सदर टिप्पर दंडात्मक कारवाईसाठी अंढेरा पोलिस स्टेशनला लावण्यात आले. सदर कारवाईमुळे रेतीमाफियांमध्ये खळबळ उडाली आहे. सदर पथकात तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार डॉ आस्मा मुजावर, मंडळ अधिकारी रामदास मांटे, तलाठी बरांडे, संजय हांडे, पंढरी जायभाये,नागरे, सागर देशपांडे, सानप, डोईफोडे, वाकोडे यांनी कार्यवाही केली.



# हिंदुस्थानचे युगपुरुष श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या जयंती निमित्त प्रेरणादायी व्याख्यान व स्तुत्य उपक्रम...

**जनसंचलन/चिखली**



प्रेरणादायी व्याख्यान व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले याला निमित्त होते मराठा साम्राज्याचे उत्तर भारतातील अभेद्य बुरुज, श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांची ३३१ वी जयंती. या जयंती सोहळ्या निमित्त चिखली शहरातील तसेच पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परिक्षा मार्गदर्शनाचे आयोजन केले होते. विक्री कर निरीक्षक श्री अनिलकुमार धारे तसेच चिखली पोलिस स्टेशन चे पी. एस. आय. श्री भागवतकर साहेब , सोनाजी आदबने प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार श्री हरिदासजी वीर साहेब होते. यावेळी असंख्य युवक व युवती या मार्गदर्शन प्रेरणादायी व्याख्यानासाठी उपस्थितध्येय साध्य करण्यासाठी सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा असे प्रतिपादन श्री अनिल कुमार धारे यांनी केले तर आयुष्यातील वेळेचे महत्त्व जपुन मिळालेल्या संधीचे सोने करावे असे आवाहन नायब तहसिलदार हरिदासजी वीर यांनी केले. तीन तास सुरू असलेल्या या जयंती सोहळ्याला अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या, तसेच चिखली पोलिस स्टेशनचे ठाणेदार श्री संग्राम पाटील साहेब यांनी आयोजकांचे कौतुक करून या स्तुत्य उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. आपल्या आयुष्यात आपण सकारात्मक राहून प्रगती करणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री सुभाष वीर यांनी केले तर शैलेश धारे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करत थोडक्यात श्रीमंत मल्हारराव होळकर यांचा जीवनपट उलगडला. यावेळी मदनजी गायकवाड, गजानन कळंगे, कडूबा गवारे, प्रभाकर जारे, भानुदास गवारे, विलास खरात, जगन्नाथ गवारे, सागर खरात इ. मान्यवर उपस्थित होते तर कार्यक्रमासाठी अभिषेक वीर, अमर शेळके, हर्षल जोशी, आदि सह जय मल्हार मित्र मंडळ यांनी मेहनत घेतली.

# पवित्र रमजान महिन्यात निष्पाप शेख शिराज चा अपघातात बळी संतप्त नातेवाईकांचा रस्त्यांवर ठिया

**जनसंचलन/ शेगाव**

शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील अजिसपुर पाटीजवळ अज्ञात व्यक्तीने वाहनांचा धडकेत एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना ही दि . १४ मार्च रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान घडली . घटनेच्या निषेधार्थ संतप्त नातेवाईकांनी सकाळी साडे सहा वाजेपासून लोणार-तळणी रोडवरील अजिसपुर पाटीवर टायर्स जाळून रस्त्यांवर ठिय्या मांडला आहे. या अपघात शेख शिराज शेख अयुब ( वय ३० ) रा. अजिसपुर ( ता. लोणार , जि. बुलढाणा ) हा आपली दूचाकी क्र. एएच १७ बी सी ९२१० ने गावाकडून लोणार कडे जात असताना अज्ञात वाहनांने त्यांचा दुचाकी ला जबर धडक दिली या धडकेत दुचाकी हिचा अक्षरशा: चकनाचुर झाला. व अपघातातील जख्मीला गावातील नागरिकांनी मेहकर येथील खाजगी रुग्णालयात नेले परंतु फार मोठ्या प्रमाणात मार लागलेला असल्याने पुढील उपचारासाठी जालना कडे नेत असताना रस्त्यातच त्याची प्राणजोत माळविली. पुर्णा नदीकाठच्या हद्दीतून मोठ्या प्रमाणात रात्रंदिवस अवैध वाळू वाहतूक राजरोसपणे लोणारकडे सुरु आहे त्या वाळू वाहनांवर महसूल विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याने रात्र दिवस अवैद्य रेती वाहतूक राजरोस सुरू आहे कर्तव्य दक्ष जिल्हाधिकारी यांनी अवैद्य रेती वाहतूक बंद करण्याचे सक्त निर्देश दिलेले असतांना त्यांचा आदेशाला मात्र लोणार तहसीलदार यांच्या कडून केराची टोपली दिली जाते अवैद्य रेती वाहतूकीच्या वाहनांवर नंबर गायब असतो असे असतांनाही वाहतुक परिवहन अधिकारी यांचे चे दूर्लक्ष ? लोणार हद्दीत येऊन मंठा तहसीलदारांकडुन वाळू वाहतूकीविरुध्द कारवाई होते . पण , लोणार तहसीलदार मात्र कोणतीच कार्यवाही करत नाहीत या वरून असे दिसून येते की अवैद्य वाळू वाहतूकीला यांचे अभय असल्याचे दिसून येते असा संतप्त आरोप तसेच यांसह अन्य आरोप संतप्त नातेवाईक शेख अतिक शेख चाँद , शेख रसीद शेख दस्तगीर , शेख यासीन शेख कासम , शेख मुहमद रफीक यांच्यासह ग्रामस्थांनी केला.




आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रू. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक रक्कम → / गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ७.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयत्तीक ठेवी करिता) | | ७.५०% | ७.५०% |
| ३ | १८१ दिवस ते १६ महिने | | ८.००% | ८.००% |
| ४ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयत्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ७.००% |
| ५ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ६ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |
| ७ | सुकन्या लक्षाधिश ठेव योजना | | ८.७०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर ०.२५% टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# संदीप शेळकेंची जिल्हावासियांना साद म्हणाले, तुम्ही बदल घडवा, मी जिल्हा घडवितो!

## परिवर्तन रथयात्रेला मेहकर तालुक्यात भरभक्कम प्रतिसाद..





जनसंचलन/मेहकर

बुलढाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा मेहकर तालुक्यात सुरू आहे. दरम्यान रथयात्रेला ठिकठिकाणी भरभक्कम प्रतिसाद पाहायला मिळतोय. तुम्ही देत असलेल्या प्रेमाने भारावून गेलो, अशी भावना व्यक्त करत तुम्ही बदल घडवा, मी जिल्हा घडवतो. असे प्रतिपादन वन बुलढाणा मिशनचे संस्थापक तथा शाहू परिवाराचे अध्यक्ष संदीप शेळके यांनी केले. आज शनिवार ,१७ मार्चच्या सकाळी मेहकर तालुक्यातील चायगाव येथे झालेल्या कॉर्नर सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, नव्याने जेव्हा वन बुलढाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा सुरू झाली. तेव्हा प्रस्थापित नेत्यांनी आपल्यावर टीका केली. म्हणाले हा येडा झाला, अशी यात्रा काढून राजकारण होऊ शकते का? अशी चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात सुरू होती. परंतु आपण करिअर म्हणून नाही, तर विकास घडवून आणण्यासाठी राजकारणात आलो आहे. ठीकठिकाणी वन बुलढाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेला मिळणारा प्रतिसाद पाहून प्रस्थापित नेत्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. आजवर ज्यांना आपण निवडून दिल, ते गप्प राहिले. विकासाविषयी कोणी बोललं नाही आणि त्यामुळेच जिल्ह्याचा विकास खुंटला असल्याचा आरोप संदीप शेळके यांनी केला. आपल्याजवळ सुरुवातीलाच विकासाचे धोरण असल्याने जनतेचा कौल वन बुलढाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेला लागून आहे. यामुळे आता जनतेने ठरवलंच तर मी जिल्हा वासियांना आवाज देतो, तुम्ही बदल घडवा मी जिल्हा घडवून दाखवतो अशी ग्वाही शेळके यांनी आपल्या भाषणातून दिली.शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना ते म्हणाले, आजवर नेत्यांनी अनेक रस्ते केले असतील पण पांदण रस्त्याचा विचार कोणाच्या मनामध्ये आला नाही. शेत शिवारातल्या सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचा हा प्रश्न आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. बुलढाणा जिल्ह्यातील सर्वाधिक जनता शेतीवर अवलंबून आहे. जिल्ह्यातला काही तालुक्यात अजूनही पिक विम्याचे पैसे पोहचले नाही. काही शेतकऱ्यांना यापासून वंचित ठेवण्यात आल. सोयाबीन कापसाला भाव नाही. अशी गंभीर स्थिती असताना दिल्ली दरबारी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न मांडून , यासाठी झगडण्याची आता वेळ आली आहे. जनतेने खासदारकीची संधी दिली तर आपण निश्चितच यासाठी सरकारशी भांडण करू आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना सुरू करू अशी आपली एकंदर भूमिका आहे. जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी, तरुणांच्या रोजगारासाठी तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी बनवण्याचा निर्धार आपण केला आहे. वेळोवेळी आपण विकासाचे व्हिजन मांडत आहोत, ती सगळी संकल्पना प्रत्यक्षात उतरण्यासाठी जनतेने संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्हावासीयांनी मला संधी द्यावी, आणि ऐतिहासिक विकासाची प्रचिती घ्यावी असा शब्द समस्त जनतेला संदीप शेळकेंनी दिला. पुढे वन बुलडाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा मोहदरी, वडगाव माळी, सोनाटी, बोरी , उकळी सुकळी या गावाच्या दिशेने मार्गस्थ झाली.

# निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांना दिलासा जमा...

## वैद्यकीय अधिकाऱ्यांचा दाखला ग्राह्य...

जनसंचलन/बुलढाणा

माझा भाऊ. ग्रामीण आणि शहरी भागातील निराधार आणि वंचित वृद्ध नागरिकांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य सरकार संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून विविध योजना राबविल्या जात आहे. मात्र या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेकांकडे वयाचा दाखला नसल्याने वंचीत राहावे लागत होते त्यामुळे वृध्द व्यक्तीला लाभ मिळावा यासाठी चिखली तहसिल विभागाने श्रवणबाळ निवृत्तीवेतन योजनेसाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांचा दाखला ग्राहय धरला आहे त्यामुळे शेकडो वयोवृध्द लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळत आहे. चिखली तहसील कार्यालया अंतर्गत १३० ते १४० गावे असून अनेक गावे ही तालुक्या पासून दूर आहेत. त्यामुळे शासकिय योजनांचा लाभ या लोकांपर्यत पोहचत नसल्याने अनेक वयोवृध्दाना उपाशीपोटी व हालकीचे जिवन जगावे लागत आहे. या गोरगरीब ६५ वर्षावरील वयोवृध्द लोकांना त्यांच्या वृद्धापकाळात त्यांना कोणावरही अवलंबून राहावं लागणार नाही तसेच त्यांच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी श्रावण बाळ निवृत्तीवेतन योजनेच्या माध्यमातून दरमहा १५ शे रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येते. वयोवृध्दांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी अर्जावर स्थानिक गावातील सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक, तलाठी, यांच्या स्वाक्षऱ्या घेवून उत्पनाचा दाखला, वयाचा पुरवा म्हणुन शाळेची टिसी, अथवा कोटवर बुक नक्कल घेवून ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे बंधनकारक आहे त्यामुळे अर्जदाराला शासकीय कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. तसेच या योजनेची रक्कम ही लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात थेट होते. परंतु अनेक ज्येष्ठ लाभार्थाकडे वयाचा पुरवा त्यांमध्ये शाळेची टीसी, व कोटवार बुक नक्कल नसल्याने या निवृत्ती वेतन योजने पासून वंचित राहावे लागत होते त्यातच काही दलाल सक्रीय सहभागी होवून लाभार्थ्यांची हजारो रुपयांनी फसवणूक करीत असत हा प्रकार चिखली महसूल विभागाच्या लक्षात आल्याने सदर वयोवृध्दांना या श्रावण बाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ मिळावा यासाठी शाळेची टिसी, कोटवार बुक नक्कल, नसेल तर वैद्यकीय अधिकाऱ्यांचा ६५ वर्ष वय असल्याबाबत दाखला असणे बंधनकारक केले आहे त्यामुळे गेल्या काही महिन्यापासून अनेक वंचित राहिलेल्या ज्येष्ठ महिला पुरुषांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांचा दाखला घेवून मानधन घेत आहे त्यामुळे सर्वसामान्य गोरगरीब ज्येष्ठ नागरीकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत आहे.

# वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची क्षमता वर्धित मॉड्यूल अंतर्गत पंचायत समिती कार्यालय, बुलढाणा येथे अभ्यास भेट...




जनसंचलन/बुलढाणा

जिजामाता महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील बी.कॉम. भाग १ सेमेस्टर २ च्या विद्यार्थ्यांची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचा एक भाग असलेल्या ङ्कक्षमता वर्धित मॉड्यूलङ्खअंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत कोठे सर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक पंचायत समिती कार्यालय येथे अभ्यास भेट आयोजित करण्यात आली होती. या भेटी साठी एकूण ५० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या अभ्यास भेटी मध्ये विद्यार्थ्यांनी पंचायत समितीच्या विविध विभागाला भेटी दिल्या त्या मध्ये कृषि विभाग, सामान्य प्रशासन विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग अशा विविध विभागांना भेटी देऊन तेथील प्रमुखांकडून त्या त्या विभागाची माहिती मिळविण्यात आली. ही माहिती गोळा करून विद्यार्थी भेटीचा अहवाल महाविद्यालयातील आपल्या विभागात सादर करतात व या नंतर विद्यार्थ्यांना गुणदान करण्यात येते. नवीन अभ्यासक्रमात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे विविध प्राधिकरणाणा भेटी देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेउन अहवाल सादर करावा लागतो. या भेटीमध्ये वाणिज्य व व्यवस्थापन शाखा प्रमुख डॉ. सुरेश एन. गवई, प्रा. जी.एस. किरोचे, प्रा. एस.व्ही. गोडबोले यांचा सहभाग होता.

# युवकास धडक; वाहन चालकास अटक

जनसंचलन/ लोणार

रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनाने धडक दिल्याने शेख सिराज शेख आयुब या युवकाचा मृत्यू झाल्याची घटना १४ मार्च रोजी घडली होती. अपघातानंतर वाहन चालकाने पळ काढला होता. लोणार पोलिसांनी फरार झालेल्या वाहन चालकाचा शोध घेऊन १७ मार्च रोजी त्याला अटक केली मराठवाड्यातील पूर्णा नदी पत्रातून विना परवानगी रेतीचा अवैध उपसा करून विना क्रमांकाच्या वाहनातून लोणार मार्गे भरधाव वेगाने वाहने पळवल्या जात आहे. दरम्यान अनेक अपघाताच्या घटना अवैध रेती वाहतुकीमुळे घडल्या आहे. या अपघातांमध्ये आतापर्यंत १६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. गुरुवारी १४ मार्च रोजी घडलेल्या अपघातानंतर मृतकाच्या संतप्त नातेवाइकांनी सकाळी ७ वाजेपासून विदर्भ मराठवाड्याच्या सीमेवर लोणार- तळणी रोडवरील अजिसपूर फाट्यावर टायर जाळून आंदोलन केले होते यामुळे ७ तास महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहतूक खोळंबली होती. पोलिसांनी नातेवाइकांची समजूत घालून फरार वाहन चालकावर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते त्यानंतर अपर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुने यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, ठाणेदार निमिष मेहत्रे यांनी तपासाची चक्रे जलद गतीने फिरवून अवघ्या २४ तासांत टिप्पर क्र. एम एच २८ बीबी ६९६३ चा चालक संतोष चंदणपाट रा. तळणी, ता. मंठा याचा शोध घेऊन त्याला अटक केली त्याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नरेंद्र मोदी केवळ एक मुखवटा, त्यांचा आत्मा ईव्हीएममध्ये, सभेत राहुल गांधींची तोफ धडाडली...

वृत्तसंस्था/मुंबई

आज संपूर्ण देश लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी एकत्र आला आहे. आम्हाला भारत जोडो न्याय यात्रा काढावी लागली कारण आज माध्यमे देशाचे महत्त्वाचे प्रश्न मांडत नाहीत. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचा प्रश्न आणि अग्निवीरचा प्रश्न... हे सगळे मुद्दे आज माध्यमांमध्ये दिसत नाहीत. ईव्हीएममध्ये राजाचा आत्मा राहतो. आज राजाचा आत्मा देशातील प्रत्येक संस्था, ईडी आणि सीबीआयमध्ये आहे, असं म्हणत राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोपाच्या निमित्ताने मुंबईत भारत आघाडीची रॅली आयोजित करण्यात आली होती. रॅलीला संबोधित करताना राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे.काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या शिवाजी पार्कमध्ये इंडिया अलायन्सची मेगा रॅली होत आहे. राहुल गांधींसह या सभेसाठी काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी वढेरा, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, शरद पवार, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन आणि भारत आघाडीचे इतर नेते आले आहेत. यावेळी राहुल गांधी यांनी केंद्र सरकारसह भाजपवर जोरदार निशाणा साधला आहे. तसेच अशोक चव्हाणांवरही वक्तव्य केले आहे.राहुल गांधी म्हणाले की, ईव्हीएमशिवाय नरेंद्र मोदी कोणतीही निवडणूक जिंकू शकत नाहीत. राहुल गांधींनी ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करत निवडणूक आयोग ईव्हीएममधून बाहेर पडणाऱ्या स्लिप्सशी जुळवून घेण्यास का तयार नाही, असा सवाल केला. नरेंद्र मोदी हा केवळ मुखवटा असल्याचे ते म्हणाले.



ते एक अभिनेता आहेत. तसेच ते एक पोकळ व्यक्ती असल्याचं वक्तव्य राहुल गांधी यांनी केलं आहे. अनेक नेत्यांना धमकावले जात आहे आणि लोक भीतीपोटी भाजपमध्ये सामील होत आहेत, असंही ते म्हणाले आहेत. हे आज सकाळी करा आणि उद्या आणि परवा हे करा. सकाळी उठून समुद्रात जा आणि सी प्लेनमध्ये चढा. त्यांनी पंतप्रधान मोदी ५६ इंचाची छाती नसून पोकळ व्यक्ती आहेत, असं राहुल गांधी म्हणाले आहेत. भारत जोडो यात्रेचा उल्लेख करताना ते पुढे म्हणाले की, गेल्या वर्षी त्यांनी कन्याकुमारी ते काश्मीर असा प्रवास केला होता आणि हा प्रवास त्यांना करावा लागला होता. २००४ आणि २०१० मध्ये मला प्रवास करावा लागेल याची कल्पनाही केली नव्हती. देशाचे लक्ष वेधण्यासाठी विरोधकांना प्रवास करावा लागला आहे. हा प्रवास राहुलचा नसून संपूर्ण विरोधकांचा होता. सार्वजनिक प्रश्नासाठी प्रवास करावा लागला.राहुल गांधी म्हणाले की, आमची लढाई एका व्यक्तीविरुद्ध नाही, आम्ही एका शक्तीविरुद्ध लढत आहोत. सीबीआय, ईडी आणि आयटी या केंद्रीय तपास यंत्रणांच्या माध्यमातून अनेक नेत्यांना धमकावलं जात असल्याचं ते म्हणाले. या भीतीपोटी लोक भारतीय जनता पक्षात सामील होत आहेत.

---

# एक जागा, प्रचंड त्रागा! ठाकरे, शिंदेंची विचित्र कोंडी; हक्काची जागा जाणार मित्रांच्या तोंडी?

वृत्तसंस्था/ मुंबई

लोकसभा निवडणुकीच्या तारखा काल जाहीर झाल्या. महाराष्ट्रात पाच टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे. त्याची सुरुवात १९ एप्रिलपासून होईल. लोकसभा निवडणूक जाहीर झाली असली महाविकास आघाडी आणि महायुतीला जागावाटप जाहीर करता आलेलं नाही. सत्ताधारी युती आणि विरोधातील आघाडी, दोन्हीकडे जागावाटपाचा तिढा कायम आहे.महायुतीचं जागावाटप पुढच्या २४ तासांमध्ये जाहीर होण्याची शक्यता आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपला सर्वाधिक ३०, शिंदेंच्या सेनेला ११ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ७ जागा मिळू शकतात. विशेष म्हणजे भाजपनं शिंदेंच्या काही जागांवर दावा सांगितला आहे. विदर्भातील रामटेक मतदारसंघ भाजपला सोडा, अशी विनंती भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी कालच केली आहे.रामटेकचे विद्यमान खासदार कृपाल तुमाने पक्षफुटीनंतर शिंदेंसोबत गेले. त्यांची जागा भाजपला दिल्यास शिवसैनिकांमध्ये चुकीचा संदेश जाऊ शकतो. शिंदेंना त्यांच्या विद्यमान खासदाराची जागा वाचवता आली नाही, असा मेसेज यामुळे जाईल. त्यामुळे रामटेकची जागा आपल्यालाच मिळेल यासाठी शिंदेंचे प्रयत्न सुरू आहेत. रामटेकची जागा वाचवण्यासाठी शिंदे हरतऱ्हेचे प्रयत्न करत आहेत.दुसरीकडे उद्धव ठाकरेंदेखील रामटेकमुळे अडचणीत आले आहेत. युती-आघाडीच्या राजकारणात या जागेवर २०१९ पर्यंत सेना विरुद्ध काँग्रेस असा संघर्ष झाला. तुमाने यांनी २०१४ आणि २०१९ मध्ये इथे काँग्रेस उमेदवाराचा पराभव केला. पण तुमाने सध्या शिंदेंसोबत आहेत. मागील निवडणुकीत सेनेनं ही जागा जिंकल्यानं महाविकास आघाडीच्या जागावाटपात उद्धव ठाकरे रामटेकसाठी आग्रही आहेत. पण काँग्रेसनं या जागेवर दावा सांगितला आहे. ठाकरे रामटेकची जागा काँग्रेससाठी सोडतील, अशी दाट शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे. कित्येक दशकांपासून लढवलेली जागा काँग्रेसला का सोडायची, असा त्यांचा सवाल आहे.





# कर्जाला कंटाळून सुलतानपूर येथील युवकाची आत्महत्या

जनसंचलन/ सुलतानपूर

वाढत्या कर्जाच्या डोंगराला कंटाळून ३३ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १७ मार्च रोजी सुलतानपूर येथे घडली. प्रकाश प्रभाकर नरवाडे असे मृतकाचे नाव आहे. सुलतानपूर येथील प्रकाश प्रभाकर नरवाडे हे १७ मार्चच्या सकाळी बाहेरून येतो असे घरातील लोकांना सांगून निघून गेले होते. बराच वेळ झाला तरी घरी न परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला असता एका शेतात जाऊन लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेला आढळले. ते घरातील कर्ते होते. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुली, वृद्ध आई, वडील व लहान भाऊ असा परिवार आहे त्यांच्या अचानक जाण्याने घरातील कर्ताच गेल्याने गरीब परिस्थितील हे कुटूंब अक्षरशः खचले आहे. मृतक प्रकाश यांच्यावर लोकांचे देणे असल्यानेच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे समजते. याप्रकरणी मृतकाचा भाऊ संतोष प्रभाकर नरवाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम
ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958